30 AUG 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## डी. वाय. पाटील हॉस्पिटलशी सामंजस्य करार : आयुर्वेदिक उपचार पद्धतीचा शोध

# मधुमेह संशोधनात विद्यापीठाचे आणखी एक पाऊल

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात गेल्या पंधरा वर्षांपासून सुरु असलेल्या मधुमेहविषयक संशोधनातून उपयुक्त आयुर्वेदिक औषध निर्माण करण्यात यश आले आहे. आता अंतिम टप्प्यातील मानवी चाचण्यांसाठी विद्यापीठाने डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटलशी सामंजस्य करार केला आहे.

विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत गेल्या २३ ऑगस्ट रोजी झालेल्या या सामंजस्य करारावर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व डॉ. अकल्पिता अरविंदेकर यांनी, तर डी. वाय. पाटील हॉस्पिटलच्या वतीने अधिष्ठाता डॉ. आर. के. शर्मा आणि डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले यांनी स्वाक्षरी केल्या. या कराराअंतर्गत करण्यात येणाऱ्या चाचण्यांना रुसा (महाराष्ट्र) यांचे सहकार्य असेल. या अंतर्गत मधुमेहग्रस्त, मधुमेह-पूर्व तसेच नियंत्रित अशा तीनही प्रकारच्या सुमारे



शिवाजी विद्यापीठ आणि डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल यांच्यात मधुमेहाविषयक संशोधनाबाबत सामंजस्य करार करण्यात आला. या कराराच्या कागदपत्रांची देवाण-घेवाण विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि डी. वाय. पाटील हॉस्पिटलचे अधिष्ठाता आर. के. शर्मा यांनी केली. यावेळी डावीकडून डॉ. अकल्पिता अरविंदेकर, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले उपस्थित होते.

शंभर रुग्णांवर चाचण्या घेण्यात येणार आहेत. त्यांच्यावरील औषधांच्या परिणामांचा अभ्यास करण्यात येणार आहे. या प्रकल्पावर प्रा. शिम्पा शर्मा या सह-प्रधान संशोधक म्हणून, तर डॉ. अरविंद गुलबके आणि डॉ. वेणुगोपाल हे सह-प्रकल्प संशोधक म्हणून काम करीत आहेत. दरम्यान, विद्यापीठाच्या जैवरसायनशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. अकल्पिता अरविंदेकर यांना राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या अंतर्गत सुमारे ३५ लाख रुपयांचा महा-संशोधन प्रकल्प मंजूर झाला आहे. 'स्टॉप डायबिटीस- डेव्हलपमेंट ऑफ न्यूट्रास्युटिकल प्रोडक्ट फॉर प्रिव्हेन्शन ऑफ प्रोग्रेशन ऑफ प्रि-डायबिटीस टू डायबिटीस मेलिटस' असे या प्रकल्पाचे नाव आहे. डॉ. अरविंदेकर यांच्या नेतृत्वाखाली संशोधकांचा गट गेल्या १५ वर्षांपासून मधुमेहासंदर्भात आयुर्वेदिक उपचार पद्धती शोधण्यासाठी संशोधन करीत आहे. त्यांना आयुर्वेदिक तज्ज्ञ डॉ.

> विद्यापीठीय संशोधनाचा समाजाला व्यापक लाभ होण्याच्या दृष्टीने या सामंजस्य कराराचे महत्त्व मोठे आहे. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी या प्रकल्पाला सातत्याने दिलेल्या प्रोत्साहनामुळेच आज हा सामंजस्य करार झाला आहे.
>
> - डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ

विवेक हळदवणेकर यांचे सहकार्य लाभत आहे. या संशोधनांतर्गत गेल्या तीन वर्षांपासून मधुमेहाची सुरुवात नेमकी कशामुळे होते, यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. त्यातून संशोधित करण्यात आलेल्या औषधाच्या विविध मान्यताप्राप्त प्रयोगशाळांत, प्राण्यांवरही यशस्वी चाचण्या करण्यात आल्या आहेत. आता मानवी चाचण्यांसाठी डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटलसमवेत सामंजस्य करार करण्यात आला आहे. या प्रस्तावाला हॉस्पिटलच्या नोंदणीकृत नैतिक समितीची मान्यता मिळाली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 0 AUG 2017

सकाळ

# डी. वाय. पाटील हॉस्पिटलशी शिवाजी विद्यापीठाचा करार



कोल्हापूर, ता. २९ : मधुमेहविषयक संशोधनातून निर्माण झालेल्या आयुर्वेदिक औषधाच्या अंतिम टप्प्यातील मानवी चाचण्यांसाठी शिवाजी विद्यापीठाने डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटलसमवेत नुकताच सामंजस्य करार केला.

विद्यापीठाच्या जैवरसायनशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. अकल्पिता अरविंदेकर यांना राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या (रुसा) अंतर्गत सुमारे ३५ लाख रुपयांचा महा-संशोधन प्रकल्प मंजूर झाला आहे. स्टॉप डायबिटीस-डेव्हलपमेंट ऑफ न्यूट्रास्युटिकल प्रोडक्ट फॉर प्रिव्हेन्शन ऑफ प्रोग्रेशन ऑफ प्रि-डायबिटीस टू डायबिटीस मेलिटस असे नाव आहे.

डॉ. अरविंदेकर यांच्या नेतृत्वाखाली संशोधकांचा गट पंधरा वर्षांपासून मधुमेहासंदर्भात आयुर्वेदिक उपचार पद्धती शोधण्यासाठी संशोधन करत आहे. त्यांना डॉ. विवेक हळदवणेकर मदत करत आहेत. संशोधनांतर्गत तीन वर्षांपासून मधुमेहाची सुरवात नेमकी कशामुळे होते, यावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. त्यातून संशोधित करण्यात आलेल्या औषधाची विविध मान्यताप्राप्त प्रयोगशाळांत प्राण्यांवर यशस्वी चाचण्या केल्या आहेत. आता मानवी चाचण्यांसाठी डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटलसमवेत सामंजस्य करार करण्यात आला आहे. या प्रस्तावाला हॉस्पिटलच्या नोंदणीकृत नैतिक समितीची मान्यता मिळाली आहे. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या उपस्थितीत सामंजस्य करारावर विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. अरविंदेकर यांनी तर डी.वाय. पाटील हॉस्पिटलच्या वतीने कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले, अधिष्ठाता डॉ. आर.के. शर्मा यांनी स्वाक्षरी केल्या. प्रकल्पावर प्रा. शिम्पा शर्मा या सह-प्रधान संशोधक म्हणून तर डॉ. अरविंद गुलबके, तर डॉ. वेणुगोपाल हे सह-प्रकल्प संशोधक म्हणून काम करत आहेत.

जनसंपर्क कक्ष
3 0 AUG 2017 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# माहिती तंत्रज्ञानाचा वापर गरजेचा

## पानी : शिवाजी विद्यापीठातील संगणकशास्त्र विभागाची कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विद्यापीठ प्रशासन गतिमान करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजच्या (एआययू) संशोधन विभागाचे उपसंचालक प्राचार्य डॉ. अमरेंद्र पानी यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील संगणकशास्त्र अधिविभाग आणि एआययूतर्फे आयोजित राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. संगणकशास्त्र विभागातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते. 'इमर्जिंग ट्रेंड्स इन इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी इन युनिव्हर्सिटी मॅनेजमेंट' असा या कार्यशाळेचा विषय आहे. डॉ. पानी म्हणाले, माहिती तंत्रज्ञानासह विविध विषयांच्या अभ्यासक्रमामध्ये एकसारखेपणा असणे आवश्यक आहे. उद्योग, शिक्षण यातील दरी भरुन काढण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग व्हावा. डॉ. शिर्के म्हणाले, युजीसीच्या ध्येयधोरणांनुसार विद्यापीठातील विविध विभागांमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर चांगल्या प्रकारे होत आहे. डॉ. नांदवडेकर म्हणाले, बदलत्या काळानुसार संगणकीय ज्ञान आत्मसात करण्याची गरज आहे. कार्यक्रमास तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर, संगणशास्त्र अधिविभागातील डॉ. व्ही. एस. कुंभार, प्रसन्न करमरकर, कबीर खराडे, प्रसाद गोयल, परशुराम वडार, आदी उपस्थित होते. संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. आर. आर. मुधोळकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. के. एस. ओझा यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. यु. आर. पोळ यांनी आभार मानले. या कार्यशाळेत देशभरातील विविध विद्यापीठांतील ५० पदाधिकारी सहभागी झाले आहेत. त्यांना माहिती तंत्रज्ञानातील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.



कोल्हापुरात सोमवारी शिवाजी विद्यापीठातील संगणकशास्त्र अधिविभागमधील राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. आर. आर. मुधोळकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डावीकडून कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, 'एआययू'चे उपसंचालक प्राचार्य डॉ. अमरेंद्र पानी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

3 0 AUG 2017

पुढारी

# गतिमान प्रशासनासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक : डॉ. पानी

**कोल्हापूर, प्रतिनिधी**

विद्यापीठ प्रशासन गतिमान करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन नवी दिल्ली येथील असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजचे उपसंचालक प्राचार्य डॉ. अमरेंद्र पानी केले.

शिवाजीविद्यापीठाचेसंगणकशास्त्र अधिविभाग आणि असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'इमर्जिंग ट्रेंडस् इन इनफॉरमेशन टेक्नॉलॉजी इन युनिव्हर्सिटी मॅनेजमेंट' या विषयावरील राष्ट्रीय कार्यशाळेत ते बोलत होते. विद्यापीठाच्या संगणकशास्त्र अधिविभागामध्ये कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ. पानी यांनी कार्यशाळेची संकल्पना तसेच असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज स्थापनेचा उद्देश यावेळी सांगितला. प्रास्ताविक डॉ. आर. आर. मुधोळकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. के. एस. ओझा यांनी केले. आभार डॉ. यू. आर. पोळ यांनी मानले. कार्यक्रमात विद्यापीठाच्या विविध अधिविभागातील प्राध्यापक, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर, तसेच संगणशास्त्र अधिविभागातील डॉ. व्ही. एस. कुंभार, प्रसन्न करमरकर, प्रसाद गोयल, परशुराम वडार, कबीर खराडे व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 0 AUG 2017
पुढारी

# र. भा. माडखोलकर महाविद्यालयात युवा महोत्सवाचे आयोजन

**चंदगड : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सव यावर्षी चंदगड येथील. र. भा. माडखोलकर महाविद्यालयात आयोजित करण्यात आला आहे.

दि. १० सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता प्रश्नमंजूषा स्पर्धेने महोत्सवाची सुरुवात होणार असून दि. १८ ते २० सप्टेंबरदरम्यान या महोत्सवात लोकनृत्य, लोकवाद्य, लोककला, सुगम गायन, भारतीय समूहगीत, मूकनाट्य, एकांकिका, लघुनाट्य, पथनाट्य, मराठी, हिंदी, इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा वादविवाद स्पर्धा होणार आहेत.

युवा महोत्सव यशस्वी करण्यासाठी व स्पर्धक, परीक्षक अभ्यागतांना आवश्यक त्या सर्व सुविधा पुरवण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, सेवक पूर्वतयारी करत आहेत. असा युवा महोत्सव चंदगड येथे प्रथमच होत असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व रसिक प्रेक्षकांसाठी ही पर्वणीच ठरणार असल्याने या महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. पी. आर. पाटील यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 AUG 2017
तरूण भारत

# शब्द नवी सृष्टी निर्माण करतात

**प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांचे प्रतिपादन**

कोल्हापूर : मुलांनी दडपणाशिवाय लिहिले पाहिजे. लेखन हे नवनिर्मितीचे लक्षण आहे. तर शब्द हे नवी सृष्टी निर्माण करतात. म्हणून विद्यार्थीदशेपासून लिहीत रहा यातून भविष्यात एक प्रगल्भ साहित्यिक तुमच्यातून निर्माण होईल असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख प्रा. रणधिर शिंदे यांनी केले. वि.स.खांडेकर प्रशालेच्या आम्ही खांडेकरीय मासिकाच्या ५ व्या वर्धापनदिन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रशालेचे सचिव एम. एस. पाटोळे होते. कार्यक्रमाची सुरूवात वि.स.खांडेकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पन करून झाली. गीतमंच ग्रुपतर्फे स्वागतगीत सादर करण्यात आले. संस्थेच्या सचिव वंदना काशिद यांनी अंकाविषयी मनोगत व्यक्त केले. यावेळी अंकाच्या संपादकीय प्रमुख इंद्राणी पाटील, बी. बी. मगदूम, अनिल चव्हाण, मधुकर भिऊंगडे यांची उपस्थिती होते. सुत्रसंचालन सेजय भोई हिने तर समिज जमादार यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 AUG 2017
महाराष्ट्र टाईम्स

# टॉयलेट एक प्रेम कथा : काळाची गरज



भारत हा चित्रपट निर्मितीबाबत जगातील महत्वाचा देश आहे. दरवर्षी किमान दीड हजार चित्रपट निर्मिती आपण करतो. याशिवाय माहितीपट, लघुपटांची निर्मिती होते. याच महिन्यात प्रदर्शित झालेल्या अक्षयकुमार व भूमी पेडणेकर यांच्या 'टॉयलेट एक प्रेम कथा' हा सामाजिक चित्रपट अंत्यंत यशस्वी ठरला असून सव्वाशे कोटींच्या घरात या चित्रपटाने व्यावसायिक यश मिळवले आहे. उघड्यावर शौचालयाला जाणाऱ्यांमध्ये भारत हा एक देश असून, युनिसेफच्या आकडेवारीनुसार 'जगातील उघड्यावर शौचालयाला जाणाऱ्या एकूण लोकसंख्येपैकी भारतात ५९ टक्के लोकांचा समावेश होतो. याचा परिणाम, पाच वर्षे वयोगटाच्या आतील दोन लाख मुले दरवर्षी डायरियाने दगावतात. याशिवाय याच कारणासाठी सर्पदंषाने मृत्यू होणाऱ्यांचे प्रमाण हे लक्षणिय आहे. हरियाणामध्ये 'नो टॉयलेट - नो ब्राइड' ही मोहिम प्रभावीपणे राबवण्यात आली. विद्या बालन या प्रसिद्ध अभिनेत्रीने खुले में शौच... यावर केलेली सामाजिक जाहिरात ही आपल्या हृदयाचा नेमका ठाव घेते. महिला आणि सुना यांना घराबाहेर शौचासाठी पाठवणे यामध्ये घराची कोणती प्रतिष्ठा आहे? असा नेमका प्रश्न उपस्थित करून आपण घुघंटामध्ये महिलांना ठेवतो, पण त्यांना शौचासाठी घराबाहेर पाठवतो? याकडे ही जाहिरात लक्ष वेधते.

अन्न- वस्त्र- निवारा या जशा आपल्या मुलभूत गरजा आहेत. त्याचबरोबर ' स्वच्छ पाणी, स्वच्छता' याही आपल्या तेवढ्याच महत्वाच्या गरजा आहे. अस्वच्छतेच्या वातावरणामुळे लहान आणि शालेय मुलांना अकाली मृत्यूला सामोरे जावे लागते आणि ही आकडेवारी भयावह आहे. मातेचे आरोग्य हा स्वतंत्र विषय असून एकूण 'पाणी व स्वच्छता' याकडे गंभीरपणे पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. खरे तर देशात १९५४पासून या विषयाकडे शासकीय पातळीवर काम सुरू झाले आहे. १९८६ला ग्रामीण स्वच्छता अभियान, १९९९ला संपूर्ण स्वच्छता अभियान, २०१२ ला निर्मल भारत अभियान आणि २०१४ पासून स्वच्छ भारत मिशन या विविध योजनांच्या अंतर्गत आपल्याकडे 'पाणी आणि स्वच्छता' यावर काम सुरू आहे. आता तर शहरी आणि ग्रामीण स्वच्छता यासाठी स्वतंत्र विभाग हे 'मिनिस्ट्री ऑफ ड्रिंकिंग वॉटर अंड सॅनिटेशन' या अंतर्गत कार्यरत आहेत. महात्मा गांधीजी यांच्या जन्माच्या दीडशे वर्षाच्या निमित्ताने २०१९ पर्यंत संपूर्ण भारत हे शंभर टक्के हागणदारी मुक्त करण्याचा शासनाचा मानस आहे. महाराष्ट्राचा विचार करता २०११च्या आकडवारीनुसार ३४ टक्के लोक उघड्यावर शौचालयाला जातात. यामध्ये सिंधुदूर्ग, कोल्हापूर, सातारा या जिल्ह्यांमध्ये समाधानकारक प्रगती झाल्याचे निदर्शनास आले आहे. या जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये अभिनव उपक्रम राबवलेले आहेत.

'टॉयलेटच्या अभाव' आणि 'टॉयलेट बांधणे' या दोन मुद्यांवर जिल्हा परिषदेच्या अंतर्गत असलेले 'पाणी आणि स्वच्छता' विभागाचे संबधित अधिकारी यासाठी प्रयत्नशील आहेत. अनेक 'केस स्टडीज' या विषयांवर उपलब्ध असून, यासाठी ग्रामसभेने केलेले कार्य प्रशंसनीय आहे. उस्मानाबाद जिल्ह्यात अलिकडेच सकाळी उघड्यावर शौचालयाला जाणाऱ्या पन्नास लोकांवर 'गुड मॉर्निंग' पथकाने कारवाई केल्याची बातमी झळकली होती. यातील लोकांना दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागते. एवढेच नव्हे तर अनेक ठिकाणी ' टॉयलेट एक प्रेमकथा' हा चित्रपट संबधित घटकांना दाखवण्याची व्यवस्था करण्यात आली. जागतिक बॅंकेच्या आकडेवारीनुसार स्वच्छतेच्या अभावामुळे जगात दरवर्षी सात लाख अर्भकांना बळी पडावे लागते. अर्भकांचा अकाली होणारा मृत्यू याचे एक प्रमुख कारणही आरोग्याकडे केलेली अक्षम्य हेळसांड आणि सुविधांचा अपुरा पुरवठा हेही आहे.

आपल्याकडे रोज एक नवा प्रकार उघडकीस येतो, त्यावर तावातावाने मत प्रदर्शन केले जाते. विषय ज्या वेगाने येतो, त्याच वेगाने त्यातील आपले स्वारस्य संपते. 'बुवा तेथे बाया' या अलिकडच्या दाहक वास्तवावर आता आपण काही आठवडे किमान मत व्यक्त करत राहणार आहोत. कारण हा विषय हा विचार करण्यासाठी भाग पाडणार आहे. हे खरे असले तरी आपण एक महासत्तेकडे वाटचाल करू इच्छिणारा देश आहे. आपल्याला मनापासून बदलायचे आहे, हेही वास्वत आहे. आपली विकासाकडे वाटचाल करण्यासाठी, लोकांची मानसिकता तयार करण्याची रोज नवी आव्हाने पेलणाऱ्या ' स्वच्छ भारत मिशन'च्या कार्याचे कौतुकही केले पाहिजे आणि याचे फलित म्हणजे 'टॉयलेट एक प्रेमकथा' होय.

● डॉ. निशा मुडे-पवार
nishapawar1968@rediffmail.com